लोकसत्ता
बुधवार, २९ डिसेंबर २०१०

# बँकेच्या परीक्षेत अंध विद्यार्थ्यांचे 'यशस्वी भव'

प्रशांत ननावरे
vruttant@expressindia.com



आजच्या स्पर्धेच्या युगात हुशारी, कामातील सातत्य आणि काम करण्याची क्षमता हे गुण ज्यांच्याकडे आहेत त्यांना भरपूर संधी उपलब्ध आहेत. त्यावेळी शारीरिक व्यगांचा फारसा विचार केला जात नाही म्हणूनच अनेक बड्या कंपन्या आपणहून अंध लोकांनाही संधी देण्यासाठी पुढे येतायत. 'इच्छा तेथे मार्ग' या उक्तीनुसार शारीरिक व्यंगावर मात करत नुकत्याच जाहीर झालेल्या २००९ च्या स्टेट बँक ऑफ इंडियाच्या कारकून पदासाठीच्या परीक्षेत अंध व्यक्तींनी लेखी परीक्षा आणि मुलाखतीव्दारे संपूर्ण भारतातून जवळपास शंभराहून अधिक जागा पटकावल्या आहेत. त्यामध्ये मुंबई व महाराष्ट्रातील ममता नामदेव तांबे, नामदेव तांबे, अशोक कुमार पाल, सारीका घोडके, परमेश्वर पाटील, अरूण अय्यर, महेश दौंडके आणि रंजना सालवे आदी विद्यार्थ्यांचा समावेश आहे. विशेष म्हणजे मागील वर्षी महाराष्ट्रातून अवघे पाच विद्यार्थी उत्तीर्ण झालेले असताना ही संख्या यंदा तिप्पट म्हणजे १५ इतकी झाली आहे.

स्टेट बँक ऑफ इंडिया ही भारतातील सगळ्यात अग्रगण्य राष्ट्रीय बँक आहे. त्यामुळे भरतीबाबत वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द झाली की, पात्र सामान्य उमेदवार ती संधी दवडत नाहित. परंतु अंध विध्यार्थ्यांसाठी जरी वेगळ्या जागा जाहिर झाल्या तरी आत्मविश्वासाच्या अभावामुळे अनेकजण परीक्षेला देखील बसत नाहीत. अशा वेळी त्यांना परीक्षेला बसण्यासाठी प्रवृत्त करणे व तयारी करून घेणे हे काम 'नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाईंड (नॅब), इंडियाचा रोजगार विभाग व प्रा. संजय मोरे हे करीत आहेत.

परीक्षेची तयारी करून घेण्यासाठी आमच्यासाठी अभ्यासाचे वर्ग आयोजित करण्यापासून प्रा. मोरे यांनी तर ते स्वतः घेत असलेल्या सामान्य मुलांसाठीच्या खाजगी बँकांच्या वर्गांनासुध्दा बसण्याची परवानगी आम्हाला दिली होती, असे मूळचा पाचोरा (जळगाव) येथील परमेश्वर पाटील म्हणाला. औरंगाबाद झोनमधून उत्तीर्ण झालेला तो एकमेव विद्यार्थी असून नुकतीच त्याची नियुक्ती जळगाव येथील मुख्य शाखेत झाली आहे. ममता तांबे म्हणाली की, प्रा. मोरे यांनी प्रत्येकावर भरपूर मेहनत घेत आम्हाला बँकिंग पध्दत व्यवस्थित समजावून सांगितलीच. पण खात्रीदेखील करून घेतली की, आम्ही सर्व परीक्षेसाठी तयार आहोत.

या अंध विद्यार्थ्यांना शिकवताना ब्रेल लिपीतून न शिकवता सामान्य मुला-मुलींसारखं फक्त लेक्चरर्सच्याच माध्यमातून शिकवले गेले. इतकेच काय पण त्यांच्यासाठी ब्रेन लिपीतून कोणत्याही नोटस् उपलब्ध नव्हत्या. पण डोळे बंद असतानाही डोक्यातच जलद आकडेमोड करता यावी म्हणून त्यांना विविध सोप्या पद्धती शिकवल्या जातात. त्याचप्रमाणे सामान्य मुलांपेक्षा या मुलांना फक्त २० मिनिटेच जास्त असतात. म्हणूनच या सर्वांच्या यशाला सोनेरी किनार आहे. आनंदाची बाब म्हणजे दरवर्षी नव्याने परीक्षेला बसणा-या विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास आणि संख्या दोन्हीही वाढत आहे, असेही प्रा. मोरे यांनी निदर्शनास आणले. ■